**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्रमांक पोमसं/८-अ/नि.सू.-२०१५-१६(का.अ.-प्र.अ.)जिल्हा/२५/२०१६. मुंबई दिनांक: १८/०४/२०१६.

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील कार्यालय अधीक्षकांना प्रशासकीय अधिकारी पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | कार्यालय अधीक्षकाचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री. विजयसिंह रामसिंह चौहान | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | पोलीस आयुक्त, नाशिक शहर |
| २. | श्री. शिवाजी बळवंत कोष्टी | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | पोलीस आयुक्त, सोलापूर शहर |

**प्रवीण दीक्षित**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत,**

पोलीस आयुक्त, नाशिक शहर / सोलापूर शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक. औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद / कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर / नाशिक परिक्षेत्र, नाशिक
पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण / कोल्हापूर

२. सदर पदोन्नती ही पोलीस महासंचालक यांच्या जिल्हा लिपिक संवर्गातील प्रशासकीय अधिकारी यांची दि.३१.८.२०१६ अखेरची बिंदूनामावली शासनाकडुन प्रमाणित करण्याच्या अधिन असून, बिंदू नामावलीच्या आरक्षणामध्ये काही फेर फार झाल्यास संबंधीत परिणाम होणाऱ्या प्रवर्गातील प्रशासकीय अधिकाऱ्यांना कार्यालय अधीक्षक पदावर तात्काळ पदावनत करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी .

३. उपरोक्त कार्यालय अधीक्षकांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयात पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पहावी.

४. उपरोक्त कार्यालय अधीक्षकांविरुध्द वरिलप्रमाणे काहीच प्रलंबित नसेल तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना **पर्यायी कार्यालय अधीक्षकांची वाट न पाहता**, पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, त्यांना कार्यमुक्त केल्याचा व ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

५. शासन निर्णय, वित्तविभाग, क्रमांक पीएच्वाय्/१०८२/सीआर्/११००(२)/असईआर्-३, दिनांक ६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त कार्यालय अधीक्षकांनी कृपया नोंद घ्यावी.

६. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

७. वर नमूद कार्यालय अधीक्षकांपैकी ज्यांना पदोन्नती नाकारावयाची असेल, त्यांनी त्यांचे अर्ज **सात दिवसांचे** आंत घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावेत.

**प्रत :-** कार्यासन अधिकारी, का.क्र. १० व १२

**( अर्चना त्यागी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करिता